


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 7 एप्रिल 2026 | अंक क्र. 318 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# श्री क्षेत्र नारायणगड व श्री क्षेत्र भगवान गडाच्या नारळी सप्ताहाच्या सांगतेस आ. धनंजय मुंडे राहणार उपस्थित


## उमापूर व बडेवाडी दोन्ही गावातील नारळी सप्ताहाची आज काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता, धनंजय मुंडे उपस्थित राहणार



■ परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) -

श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्हीही आध्यात्मिक गडांच्या नारळी सप्ताहाची आज (ता. ०७) एकाच दिवशी सांगता होणार असून या दोन्ही सप्ताहांना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे हे उपस्थित राहणार आहेत.

श्री क्षेत्र नारायण गडाचा पारंपरिक नारळी सप्ताह हा गेवराई तालुक्यातील उमापूर येथे संपन्न होत असून धनंजय मुंडे हे आधी उमापूर येथील या सप्ताहास भेट देऊन श्रीनगर नारायण महाराजांचे व गडाचे महंत प्रेममूर्ती ह. भ. प. श्री शिवाजी महाराज यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील. श्रीक्षेत्र भगवानगडाचा पारंपारिक नारळी



श्री संत भगवान बाबा

सप्ताह हा पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी गावात संपन्न होत असून उमापूर नंतर धनंजय मुंडे हे बडेवाडी येथील सप्ताहात भेट देऊन ऐश्वर्या संपन्न संत भगवान बाबा व गडाचे महंत न्यायाचार्य ह. भ. प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांचे दर्शन व आशीर्वाद घेतील.

श्री क्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र भगवानगड या दोन्ही गडांना अखंड हरिनाम फिरत्या नारळी सप्ताहाची अनेक वर्षांची परंपरा असून माजी मंत्री धनंजय मुंडे हे मागील अनेक वर्षांपासून या दोन्ही सप्ताहाच्या सांगता समारंभात उपस्थित राहत आले आहेत. मागील वर्षी मुंबई येथून येताना हेलिकॉप्टर उड्डाणास वेळेवर परवानगी न मिळाल्याने ही परंपरा एकवेळा खंडित झाली मात्र यावर्षी पुन्हा धनंजय मुंडे हे दोन्ही नारळी सप्ताह स्थळी दर्शनासाठी येणार आहेत अशी सूत्रांची माहिती आहे.




**आध्यात्मिक व्यासपीठावरून धनंजय मुंडे बोलतील का? काय बोलतील? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

---

# 'पीएनजी' क्षेत्रातील नागरिकांना ३० जूननंतर 'एलपीजी' गॅस पुरवठा बंद; पर्यायी इंधन म्हणून केरोसीनचे वाटप होणार

■ मुंबई: वृत्तसंस्था

राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी पीएनजी जोडणीसाठी येत्या ३० जूनपर्यंत अर्ज किंवा नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा ३० जूननंतर बंद केला जाईल, असा इशारा राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला आहे. घरगुती आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या वापरकर्त्यांसाठी हे बंधनकारक असल्याचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांनी सोमवारी स्पष्ट केले.

राज्यातील तेल उत्पादनांच्या पुरवठ्याबाबत माहिती देण्यासाठी मंत्रालयातील पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, उमेश कुलकर्णी (राज्य समन्वयक, तेल उद्योग) आदी उपस्थित होते. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीवर ताण असला, तरी राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा मुबलक आहे. इंधन टंचाईमुळे लॉकडाऊन लागणार असल्याच्या अफवा पसरल्याने मागील आठवड्यात रांगा लागल्या होत्या, मात्र आता परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे, असे डांगे यांनी सांगितले. सध्या दररोज १८ हजार ५०० किलोलीटर पेट्रोल आणि ४० हजार किलोलीटर डिझेलचे वितरण सुरू असून मागणी सरासरी इतकीच आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई

■ इंधनाचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथके तैनात करण्यात आली आहेत. ६ एप्रिल २०२६ पर्यंत राज्यभरात १४ हजार ३२९ तपासण्या करण्यात आल्या असून, या कारवाईत ३ हजार ६२८ सिलिंडर आणि ७१ हजार ५६५ किलो गॅस जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी ५३ एफआयआर नोंदवण्यात आले असून ३६ जणांना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मालाची किंमत सुमारे २३.८५ कोटी रुपये आहे.

### प्रति कुटुंब ३ लिटर केरोसीन मिळणार

■ केंद्र सरकारने राज्याला ३ हजार ७४४ किलोलीटर केरोसीन मंजूर केले असून, प्रति कुटुंब ३ लिटर केरोसीनचे वाटप स्वस्त धान्य दुकानांमार्फत केले जाईल. नागरिकांच्या तक्रारींसाठी ९७६९९९१२२१ हा व्हॉट्सअॅप क्रमांक जारी करण्यात आला आहे. चंद्रकांत डांगे यांची राज्यस्तरीय 'नोडल ऑफिसर' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

वाढत्या मागणीला पर्याय म्हणून पीएनजी नेटवर्क गतीने वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यासाठी प्रलंबित अर्जांना २७ मार्च रोजी 'डीम्ड परवानगी' देण्यात आली असून महानगरपालिकांना २४ तासांच्या आत मंजुरी देण्याचे आदेश दिले आहेत. फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यात ४२.३० लाख पीएनजी कनेक्शन्स होती, ज्यात गेल्या एका महिन्यात ७३ हजारांची भर पडली आहे, असेही यावेळी सांगण्यात आले

### एलपीजी वितरणाबाबत नवे नियम

राज्यातील ३.५ कोटी एलपीजी ग्राहकांसाठी काही महत्त्वाचे नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार, गॅसचे समान वाटप व्हावे यासाठी 'बुकिंग इंटरव्हल' निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सुरक्षित वितरणासाठी डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (डीएसी) अनिवार्य करण्यात आला असून ८५ टक्के वितरण या प्रणालीद्वारे होत आहे. रुग्णालये आणि शिक्षण संस्थांना १०० टक्के इंधन पुरवठा केला जाणार आहे.


# कल्याण स्थानकात तांत्रिक बिघाड; मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत, प्रवाशांचा खोळंबा

■ कल्याण वृत्तसंस्था

मध्य रेल्वेच्या प्रवाशांसाठी आजचा प्रवास मनस्तापाचा ठरला. कल्याण स्थानकावर अचानक सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे लोकल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. याचा सर्वाधिक फटका कसारा दिशेने जाणाऱ्या प्रवाशांना बसला. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी ४:१४ ची कसारा लोकल अर्ध्या तासाहून अधिक काळ कल्याण स्थानकावरच थांबून होती. ऐन गर्दीच्या वेळी सिग्नल फेल झाल्यामुळे गाड्यांच्या रांगा लागल्या आणि रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. बराच वेळ लोकल एकाच ठिकाणी उभी राहिल्याने आणि रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट माहिती मिळत नसल्याने प्रवाशांनी स्थानकावर तीव्र संताप व्यक्त केला. सध्या तांत्रिक काम पूर्ण करून वाहतूक पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र गाड्या उशिराने धावत असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. कसारा लोकल कल्याणमध्ये अडकली आंबिवली ते टिटवाळा दरम्यान दुपारी ३:३५ च्या सुमारास सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. या बिघाडामुळे दुपारी ४:१४ ची कसारा लोकल कल्याण स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर तब्बल ३० मिनिटांहून अधिक काळ उभी होती. ही ट्रेन प्रवाशांनी पूर्णपणे भरलेली असल्याने, डब्यातील उकाड्यामुळे आणि वाढत्या उशिरामुळे प्रवाशांच्या संयमाचा बांध सुटला.

अनेक प्रवाशांनी लोकल खाली उतरून प्लॅटफॉर्मवर गर्दी केली होती. भर उन्हात आणि गर्दीत प्रवासी अडकून पडल्याने रेल्वे प्रशासनाच्या कारभारावर प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सध्या बिघाड दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असले तरी, पुढील गाड्यांच्या वेळापत्रकावर याचा मोठा परिणाम झाला आहे.

# मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंडे यांच्या मातोश्रींचे निधन राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून श्रद्धांजली





■ परळी वृत्तसंस्था

मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव आणि कर्तव्यदक्ष आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या मातोश्री श्रीमती अश्रुबाई हरिभाऊ मुंडे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. अत्यंत कष्टाळू आणि जिद्दी व्यक्तिमत्त्व असलेल्या अश्रुबाईंच्या निधनाने मुंडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखाच्या प्रसंगी, दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी ताडसोन्ना येथील निवासस्थानी जाऊन तुकाराम मुंडे तसेच माजी अप्पर जिल्हाधिकारी अशोक मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मुंडे कुटुंबीयांचे सांत्वन करत दिवंगत अश्रुबाई यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. स्व. अश्रुबाई मुंडे या त्यांच्या मनमिळावू स्वभावासाठी आणि संयमी वृत्तीसाठी ओळखल्या जात होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, अपार कष्ट सोसून त्यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित आणि जबाबदार प्रशासकीय अधिकारी म्हणून घडवले. त्यांच्या निधनामुळे एका संस्कारक्षम मातेने जगाचा निरोप घेतला. या सांत्वनपर भेटीवेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रघुनाथ तोंडे, अशोक सोनवणे यांच्यासह मुंडे कुटुंबीयांचे नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# संपादकीय

## पुन्हा चंद्रमाच्या दिशेने

**५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे.**

**फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लाय-बाय' मोहीम आहे.**

**याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.**


**अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लॉंचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल. अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.**

**अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे.**

**भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.**

# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया : डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.



आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.

आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो.

शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.



■ **डॉ. राजेंद्र बगाटे**
**लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत**

# महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समितीचा नांदेड जिल्हा दौरा कार्यक्रम

नांदेड दि. 6 एप्रिल :- महाराष्ट्र राज्य विधानमंडळ अंदाज समिती 7 ते 10 एप्रिल 2026 रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ही समिती नांदेड जिल्ह्यातील विविध विभागांतर्गत सुरू असलेल्या कामांना भेट देऊन पाहणी करणार आहे. महाराष्ट्र राज्य विधानमंडळ अंदाज समितीचा नांदेड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. मंगळवार 7 एप्रिल 2026 रोजी रात्री शासकीय विश्रामगृह नांदेड येथे मुक्काम.

बुधवार 8 एप्रिल 2026 रोजी सकाळी 9 ते 9.30 वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथील संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत चर्चा. सकाळी 9.30 ते 10 वाजेपर्यंत समितीची अंतर्गत बैठक- विविध विभागाचे प्रकल्प, कामे, योजना कार्यालयांना भेटी पाहणी व बैठकी संदर्भात नियोजन करणे.

सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगर विकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषि विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी.

### दुपारी 2 ते 3 वाजेपर्यंत राखीव.

दुपारी 3 ते सायं. 5.30 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगरविकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषि विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी.

### रात्री शासकीय विश्रामगृह नांदेड येथे मुक्काम

गुरूवार 9 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगर विकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी.

### दुपारी 2 ते 3 वाजेपर्यंत राखीव.

दुपारी 3 ते सायं. 5 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगरविकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषि विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी करतील.

### रात्री शासकीय विश्रामगृह नांदेड येथे मुक्काम.

शुक्रवार 10 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगर विकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी करतील.

### दुपारी 2 ते 3 वाजेपर्यंत राखीव.

दुपारी 3 ते सायं. 5 वाजेपर्यंत संबंधित विभागाच्या प्रकल्प, कामांना, कार्यालयांना दिलेल्या भेटी व पाहणीच्या वेळी आढळून आलेल्या बाबीच्यासंदर्भात व लेखी स्वरूपात झालेल्या माहितीच्या अनुषंगाने संबधित आधिकाऱ्यांसमवेत बैठक होईल.

# डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन : १२ तास अभ्यास अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ **परळी (प्रतिनिधी)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर येथे भीम उत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. सुगंध कुट्टी परळी येथे विविध, शैक्षणिक, सामाजिक व स्पर्धा,प्रेरणादायी कार्यक्रमांच्या माध्यमातून जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.

बाबासाहेबांच्या "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" या विचारांपासून प्रेरणा घेत सलग १२ तास अभ्यास अभियान या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबवला जात असून, यंदाही विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. या अभियानात परिसरातील सुमारे ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शिक्षणाप्रती आपली बांधिलकी दर्शवली.




या प्रसंगी शहरातील यशस्वी मेकॅनिकल इंजिनियर व सध्या युनायटेड किंगडम (आयर्लंड) येथे मेट्रो रेल्वे विभागात डेप्युटी डायरेक्टर म्हणून कार्यरत असलेले इंजि. राजू जगतकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात जिद्द, चिकाटी आणि सातत्य या गुणांचे महत्त्व अधोरेखित करत, "या गुणांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते," असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक प्रेरणादायी उदाहरणे देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, "शिक्षणामुळेच आपल्या आयुष्यात सकारात्मक बदल घडतो, त्यामुळे विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही त्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे," असेही त्यांनी स्पष्ट केले. दि. ५ एप्रिल २०२६ रोजी माता रमाई आंबेडकर सभागृह येथे या उपक्रमाचे उद्घाटन पार पडले. या वेळी इंजि. राजू जगतकर, बीके कलर होमचे संचालक तसेच विनोदी कांबळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला बालाजी जगतकर, अभिजीत कांबळे, आनंद जगतकर, संजय जगतकर, अमोल अवचारे, सिद्धार्थ जगतकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी समितीचे अध्यक्ष आकाश साळवे यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व नागरिकांचे आभार मानले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# “सावधान...!! अन्नदाताच नाकारला जातोय...!”

## नोकरीच्या मोहात हरवलेला सन्मान; ‘लग्नासाठी नोकरी, आयुष्यासाठी शेती’ — खेड्यातील भीषण वास्तव

**देऊळगाव घाट - ठोंबरे बंधू**





ग्रामीण समाजात कधीकाळी शेती हा अभिमानाचा व्यवसाय मानला जायचा. शेतात घाम गाळणाऱ्या हातांकडे सन्मानाने पाहिले जायचे. पण काळाच्या ओघात चित्र बदलत गेले आणि आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, शेती करणाऱ्या मुलांसाठी लग्नाचा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होत चालला आहे. या गंभीर समस्येचा आढावा घेतला आहे आमचे देऊळगाव घाटचे प्रतिनिधी ठोंबरे बंधू यांनी या विशेष रिपोर्ट च्या माध्यमातून....

ताटातला प्रत्येक घास शेतकऱ्याच्या घामाने तयार होतो, हे आपण मान्य करतो. पण त्याच वेळी एक कटू विरोधाभास समोर येतो—ज्यांच्या कष्टावर समाज जगतो, त्या शेतकरी कुटुंबातील मुलांना मात्र संसार उभा करण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

आज ग्रामीण भागात एक न बोललेलं पण तीव्र वास्तव उभं राहिलं आहे. शेती करणाऱ्या बळीराजाच्या युवराजांना करभारीण मिळेना. मुलांसाठी लग्न जुळवणं दिवसेंदिवस कठीण होत चाललं आहे. अनेक वेळा लग्नाची चर्चा पुढे जाते; पण शेवटच्या टप्प्यावर अटी-शर्ती पुढे येतात आणि संबंध तुटतात. नोकरीवालाच मुलगा पाहिजे आशीच साद शेतकरी वधू पित्याकडूनच केली जाते. फार्म हाऊस हवे; पण फार्मर नको,

नोकरी, शहरातील घर, आर्थिक अपेक्षा—या कारणांमुळे अनेक संसार उंबरठ्यावरच थांबतात.

खेडेगाव... कधी कष्टाचं, साधेपणाचं आणि नात्यांच्या उबदारपणाचं प्रतीक असलेलं हे जगणं आज एका वेगळ्याच वळणावर येऊन ठेपलं आहे. ज्या मातीवर उभं राहून बळीराजा जगाला अन्न पुरवतो, त्याच मातीशी नाळ जोडलेल्या मुलांना आज स्वतःच्या आयुष्यासाठी जोडीदार मिळणं कठीण होत चाललं आहे. शिक्षण, नोकरी, शहरीकरण आणि बदललेली जीवनशैली यामुळे विवाहाच्या संकल्पनांमध्ये मोठा बदल झाला आहे. शेती करणाऱ्या, गावात राहणाऱ्या मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला असून, त्यांच्यासाठी लग्न ही गोष्ट दिवसेंदिवस अधिक कठीण बनत आहे. . आज अनेक कुटुंबांना मुलीसाठी शहरात नोकरी करणारा, ठराविक पगार असलेला मुलगा हवा असतो. त्यामानाने शेती करणारा मुलगा म्हणजे ‘अनिश्चितता’ असा गैरसमज वाढत चालला आहे.

### ■ कटू वास्तव : नाकारला जाणारा शेतकरी मुलगा

आज काही ठिकाणी उघडपणे असे ऐकायला मिळते—“शेती आहे? मग नको...”, “नोकरी नाही? मग लग्न कठीण...” असे शब्द शेतकरी कुटुंबांच्या जखमेवर मीठ चोळणारे ठरत आहेत.

मुलगा शिक्षित, कष्टाळू आणि सुस्वभावी असला तरी फक्त शेती करतो म्हणून त्याला नकार दिला जातो. हा केवळ नकार नाही; हा शेती व्यवसायाच्या सन्मानालाच दिलेला धक्का आहे.

### ■ नोकरी/कंपनी’ फक्त लग्नासाठी — भीषण वास्तव

ग्रामीण भागात आता एक विचित्र प्रवृत्ती वाढताना दिसते. चांगली बागायती शेती असलेल्या बळीराजाचा मुलगा, लग्न जुळावे म्हणून काही काळापुरती कंपनीची नोकरी धरतो आणि लग्न झाल्यावर पुन्हा शेतीतच राबू लागतो.

यातून एक गोष्ट स्पष्ट होते—तरुण आपली ओळख बदलतो, पण समाजाची मानसिकता बदलत नाही.

### ■ बोलणी होऊनही तुटणारे संबंध

अनेक वेळा लग्नाची चर्चा पुढे जाते; पण शेवटच्या टप्प्यावर अटी-शर्ती पुढे येतात आणि संबंध तुटतात. नोकरी, शहरातील घर, आर्थिक अपेक्षा या कारणांमुळे अनेक संसार उंबरठ्यावरच थांबतात.

यामुळे अनेक शेतकरी मुलांचे वय वाढत चालले आहे. घरात तणाव निर्माण होतो आणि मनात हताशा वाढते.

### ■ ही मानसिकता निर्माण होण्यामागे कारणे

या परिस्थितीमागे अनेक घटक कारणीभूत आहेत. समाजाने प्रतिष्ठेची व्याख्या पगाराशी जोडली आहे. शेतीतील अनिश्चिततेमुळे लोकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. शहरातील जीवनशैलीचे आकर्षण वाढले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अन्न पिकवणाऱ्या कष्टाचे महत्त्व हळूहळू कमी लेखले जाऊ लागले आहे.

### ■ आणखी एक वेदनादायक बाजू

"शेतकरी नवरा नको गं बाई" या मुलींच्या मानसिकतेमुळे आज काही ठिकाणी शेती असूनही ती लपवली जाते किंवा मुलगा “दुसरे काही काम करतो” असे सांगितले जाते, फक्त लग्न जुळावे म्हणून. ज्या व्यवसायावर देश उभा आहे, तोच व्यवसाय लपवावा लागतो, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे.

### ■ बदलाची गरज

आज गरज आहे ती विचार बदलण्याची. स्थैर्य फक्त पगारात नसते; ते कष्टात, प्रामाणिकपणात आणि माणुसकीतही असते. शेती करणारा तरुण हा ‘पर्याय’ नाही, तर समाजाचा आधार आहे.

### ■ बदलती मानसिकता आणि नवी अट

गावोगावी लग्नाची बोलणी सुरू झाली की एक अट वारंवार ऐकू येते—“आमची मुलगी तुमच्या मुलाला देतो; पण आधी आमच्या मुलासाठी स्थळ शोधा.”

ही अट केवळ एक वाक्य नाही; ती समाजाच्या बदललेल्या विचारसरणीची जाणीव करून देते. साटे लोटे हि पध्दत भविष्यात अडचणीची ठरू शकेल की कशी हे काळच ठरवेल.

### ■ “शेती टिकली तरच संसार टिकेल... आणि समाजही.”

ज्या हातांनी आपल्या ताटात अन्न येते, त्या हातांकडे जर आपण कमीपणाने पाहू लागलो, तर हा समाज स्वतःच्याच अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभं करत आहे.

शेती ही केवळ व्यवसाय नाही; ती आपल्या संस्कृतीची ओळख, अर्थव्यवस्थेचा कणा आणि जीवनाची शाश्वत हमी आहे.

आज जर आपण शेतकरी मुलांना नाकारलं, तर उद्या अन्न देणाऱ्या हातांचीच उणीव भासेल.

म्हणूनच वेळ आली आहे—विचार बदलण्याची, शेतीचा सन्मान पुन्हा जपण्याची आणि शेतकरी कुटुंबांकडे आदराने पाहण्याची.

# वाटेगाव जि. प. शाळेत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**शिराळा /प्रतिनिधी**



वाटेगाव तालुका वाळवा येथील जिल्हा परिषद शाळा नं. १ येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शैलेंद्र करांडे होते.

प्रारंभी सरस्वती पूजन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी प्रार्थना केली.

यावेळी पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, सरपंच सौ. नंदाताई चौगुले, उपसरपंच धनाजी इंगळे, उद्योजक शरद शेटे, राहुल वेदपाठक, उपाध्यक्ष एम. आर. पाटील व सर्व सदस्य, माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष एम. आर. पाटील, पोलीस पाटील संतोष करांडे, आणि शाळेचे अनेक माजी विद्यार्थी आज उपस्थित होते.

शाळेचे मुख्याध्यापक विकास पाटील यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये शाळेचा इतिहास आणि शाळेची सद्यपरिस्थिती, गुणवत्ता वाढ व शाळेच्या आवश्यक गरजा याविषयी मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांचे आणि माजी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रत्येक माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांनी स्वतःचे नाव व स्वतः करीत असलेली नोकरी, व्यवसाय याविषयी माहिती सांगत स्वतःची ओळख करून दिली. यानंतर शाळेतील वर्षभरातील विविध बौद्धिक व क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. पंचायत समिती सदस्य प्रकाश पाटील, कपाळे साहेब आणि सरपंच सौ. नंदाताई चौगुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे अध्यक्ष शैलेंद्र करांडे यांनी शाळेबद्दल आणि शाळेच्या विकासाबद्दल समाधान व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारे हॅन्डवॉश स्टेशन स्वतः उभारण्याचे जाहीर केले. कपाळे साहेब यांनीही शाळेच्या विकासासाठी रोख स्वरूपात आर्थिक योगदान दिले. सूत्रसंचालन प्रसाद हसबनीस यांनी केले. विद्यार्थ्यांचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे नियोजन विद्या पाटील यांनी केले.

# शिक्षक विद्यार्थी पालकांमध्ये योग्य समन्वय असल्यास गुणवत्तापूर्ण विद्यार्थी निर्माण होतात : प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

शिक्षक विद्यार्थी पालकांमध्ये योग्य समन्वय असल्यास गुणवत्तापूर्ण विद्यार्थी निर्माण होतात असे प्रतिपादन प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांनी लक्ष्मीबाई देशमुख महिला कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात बोलताना केले. तर पालकांनीही विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले पाहिजे असे मत संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांनी व्यक्त केले.

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला कनिष्ठ महाविद्यालयात सोमवारी (दि.०७) सकाळी ११ वाजता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पालक मेळाव्याच्या सुरुवातीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्यामराव देशमुख, माता सरस्वती व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, श्रीमती टकले, श्री ठाकुर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना प्राचार्या डॉ विद्या देशपांडे म्हणाल्या की, आमच्या महाविद्यालयात अभ्यासक्रमा बरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जातो. तसेच विद्यार्थिनी संस्कारक्षम बनवण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी पालकांच्या सहकार्याची गरज आहे. तर अध्यक्षीय समारोपात संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांनी सांगितले की, महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.आम्ही विद्यार्थ्यांकडे लक्ष ठेवतो पण पालकांनीही विद्यार्थ्यांकडे लक्ष ठेवून अभ्यासाचा पाठपुरावा केला पाहिजे. तर विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढेल. यावेळी प्राध्यापांसह पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रविण फुटके, सूत्रसंचालन प्रा प्रविण नव्हाडे तर आभार प्रा आशिलता शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा विशाल पौळ, प्रा अशोक पवार, प्रा डॉ विना भांगेसह वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'भीम विचारांची गाणी' गीताचे दिमाखात विमोचन; आंबेडकरी चळवळीला गती देणारे विचार



**पुणे/प्रतिनिधी**

मानवतावादी विचारवंत प्रा. डॉ. म.सु. पगारे यांनी शब्दांकित केलेले आणि `Dr. Sagar Chakranarayan` या यूट्यूब चॅनलवर प्रसिद्ध झालेले `भीम विचारांची गाणी` हे गीत नुकतेच एका आभासी सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. गुगल मीटच्या माध्यमातून संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वतः प्रा. डॉ. म.सु. पगारे उपस्थित होते.

### ■ तर्कशील आणि विवेकी विचारांची शिदोरी

या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध शाहिरी गायक नागसेन दादा सावदेकर उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी या गीताचे कौतुक करताना सांगितले की, "या गीताचे बोल अत्यंत तर्कशील असून ही आजच्या काळासाठी विवेकी विचारांची महत्त्वाची शिदोरी आहे."

दुसरे प्रमुख अतिथी प्रा. विजयकुमार गवई यांनी या गीताची तुलना थेट वामनदादांच्या काव्याशी केली. हे गीत आंबेडकरी चळवळीला अत्यंत शुद्ध आणि सकारात्मक पद्धतीने पुढे नेणारे ठरेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### ■ लेखाणीतून वैचारिक क्रांतीचा प्रवास-

कार्यक्रमाचे अध्यक्ष व गीतकार प्रा. डॉ. म.सु. पगारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या गीताचा प्रवास उलगडला. ते म्हणाले की, "विद्यार्थी दशेपासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय असताना, आज विद्यापीठीय स्तरावर प्रबोधन करताना गाण्यांच्या माध्यमातून ही चळवळ अधिक गतिमान व्हावी, या हेतूनेच मी हे लेखन केले आहे."

यावेळी त्यांनी चक्रनारायण आणि `सम्राट` परिवाराशी असलेल्या आपल्या दोन दशकांहून अधिक काळच्या ऋणानुबंधांना उजाळा दिला.







यावेळी `सम्राट`चे आनंद चक्रनारायण यांनी पगारे सरांच्या गेल्या २१ वर्षांच्या लेखन प्रवासाचे कौतुक केले. तर गीताचे गायक डॉ. सागर चक्रनारायण यांनी गाण्याची निर्मिती आणि सादरीकरणाचा अनुभव उपस्थितांसमोर मांडला. जेष्ठ कवी वा. ना. आंधळे यांनी सुरुवातीलाच या गीताच्या लोकप्रियतेचा विश्वास व्यक्त केला.

■ **निवेदन: संशोधक विद्यार्थिनी सुकन्या जाधव.**

आभार प्रदर्शन: डॉ. दीपक खरात यावेळी कथाकार ॲड. विलास मोरे, प्रा. डॉ. किशोर पवार, प्रा. आशुतोष पाटील, महेश सूर्यवंशी, मनोज इंगोले, भागवत सपकाळ, सुबोध वाकोडे, वृषाली भोकरीकर, सरला तायडे, डॉ. विजय घोरपडे, कृष्णा संदनशिव, खेमराज पाटील आणि अस्मादिक पगारे यांसह अनेक रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, मंगळवार, 7 एप्रिल 2026

# परळीत संत गाडगेबाबा सामाजिक मंदिर संरक्षण भिंत व सुशोभिकरण कामाचा नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ

## सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद कटिबद्ध - नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी







परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहरातील विविध विकास कामांमध्ये आणखी चालना देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे .जिल्हा वार्षिक योजना 2025- 26 अंतर्गत मंजूर गणेशपार विभागातील नागरी रुग्णालय परिसरातील संत गाडगेबाबा सामाजिक मंदिर संरक्षण भिंत व सुशोभिकरण कामाचा शुभारंभ आज नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्याहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

संत गाडगेबाबा सामाजिक मंदिरमुळे राजपूत रजक समाजाच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले असून नगर परिषदेकडून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण विकासकामांमुळे नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.या कामासाठी जिल्हा वार्षिक योजना 2025-26 अंतर्गत ₹3 लाख 12 हजार 841 इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. यामुळे परिसराचे सुशोभीकरण होऊन नागरिकांना अधिक सुरक्षित व स्वच्छ वातावरण उपलब्ध होणार आहे. तसेच सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी या ठिकाणाचे महत्त्व अधिक वाढणार आहे. संत गाडगेबाबा सामाजिक मंदिर संरक्षण भिंत व सुशोभिकरण कामाचा शुभारंभ आज नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ करण्यात आला.परळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद कटिबद्ध असून नागरिकांच्या गरजांनुसार अशा विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. परळीकर जनतेसाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न नगर परिषदेचा आहे. लोकाभिमुख कामे व जनतेप्रती समर्पित कार्य करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी यावेळी केले.या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, महिला व बालकल्याण सभापती अंजली माळी, रविंद्र गित्ते, नितीन रोडे, केशव नागरगोजे यांच्यासह अनेक मान्यवर आणि नगर परिषदेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त परळीत शांतता कमिटीची बैठक संपन्न

## नियमांचे पालन करण्याचे आवाहन



परळी : प्रतिनिधी

१४ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त परळी शहर, संभाजीनगर तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने शांतता कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आगामी जयंती उत्सव शांततेत आणि शिस्तीत साजरा व्हावा यासाठी प्रशासनाकडून मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस,उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, परळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचण,संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन गट्टूवार, पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड, नगरपरिषदेचे संतोष रोडे, पोलीस कर्मचारी, पत्रकार बांधव तसेच जयंती उत्सव समिती कमिटी यांचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्रशासनाने स्पष्ट सूचना दिल्या की, जयंती उत्सवात पारंपरिक वाद्यांचा वापर करावा, अहिंसा हा बौद्ध धर्माचा मूलमंत्र जपावा. शासनाच्या आदेशानुसार डीजे पूर्णपणे बंद असून नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी साउंड सिस्टीमची मर्यादा पाळावी, निश्चित करण्यात आलेल्या मिरवणूक मार्गाचाच अवलंब करावा, असे आवाहन करण्यात आले. “जयंती उत्सव हा सामाजिक एकात्मता आणि शांततेचा संदेश देणारा असावा. सर्व नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सण साजरा करावा,” असेही यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन गट्टूवार यांनी केले, शेवटी उपस्थितांच्या आभारानंतर करण्यात आले.

# जळगव्हाण सरपंचपदाच्या पोटनिवडणुकीसाठी रणधुमाळी; कैलास जाधव भरणार उमेदवारी अर्ज



सिरसाळा/ अतुल बडे

जळगव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीसाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. माजी सरपंचांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी कैलास जाधव यांनी शड्डू ठोकला असून, ते आपले नामनिर्देशन पत्र दाखल करणार आहेत.

काही महिन्यांपूर्वी जळगव्हाण येथील तत्कालीन सरपंचांचा एका दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला होता. त्यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त करण्यात आली होती, मात्र नियमानुसार हे पद रिक्त झाल्याने या जागेवर पोटनिवडणूक घेणे अनिवार्य होते. शासनाच्या आदेशानुसार, राज्यातील ज्या ज्या ग्रामपंचायतींची सरपंच पदे रिक्त आहेत, तिथे पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.याच पार्श्वभूमीवर जळगव्हाण ग्रामपंचायतीच्या राजकारणात आता मोठ्या घडामोडी घडत आहेत. गावातील सामाजिक कार्यात सक्रिय असणारे कैलास जाधव यांनी सरपंच पदासाठी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच ते आपल्या समर्थकांसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे उमेदवारी अर्ज सादर करणार आहेत.सरपंचपदाचे हे रिक्त पद भरण्यासाठी होत असलेल्या या निवडणुकीमुळे गावातील वातावरण राजकीयदृष्ट्या तापू लागले आहे. कैलास जाधव यांच्या उमेदवारीमुळे ही निवडणूक बिनविरोध होणार की चुरशीची ठरणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# शिवलीच्या विकास कामाला निधीची कमतरता पडू देणार नाही - आ. कराड

## हनुमान मंदिर सभा मंडपाचा आ. कराड यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

लातूर | प्रतिनिधी

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिवली येथील जागृत श्री हनुमान देवस्थानच्या कृपा आशीर्वादाने आपण विधानसभेचा आमदार झालो, या शिवली गावच्या सर्वांगीण विकास कामासाठी निधीची कसलीही कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी दिली.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील भादा सर्कलमधील शिवली येथील जागृत देवस्थान श्री हनुमान मंदिर परिसरात पंधरा लक्ष रुपये खर्च करून आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या भव्य सभा मंडपाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते रविवारी भक्तिमय वातावरणात करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, पद्माकर चिंचोलकर, संदिपान शेळके, शरद दरेकर, ॲड. दशरथ सरवदे, उद्धव काळे, बालाजी शिंदे, राजकिरण साठे, शिवराज राठोड, गुणवंत कारंडे, अच्युत ईरपे, सोमनाथ पावले, महादेवअप्पा गुरुशेट्टे, प्रदीप शिंदे, देवराव मोहिते, रविंद्र पाटील, महादेव आळणे, व्यंकट रसाळ यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. कराड यांचे शिवली गावात आगमन होताच टाळ मृदंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात फटाक्याची आतिषबाजी करून गावकऱ्यांनी जोरदार स्वागत केले. याप्रसंगी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, यापूर्वी विधान परिषदेचा मी आमदार होतो त्यावेळी हनुमान मंदिराच्या सभा मंडपासाठी १५ लक्ष रुपयाचा निधी दिला त्यातून आज भव्य सभागृह उभे राहिले असून शिवलीच्या मारुती रायाच्या कृपा आशीर्वादाने आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने विधानसभेचा आमदार झालो. येत्या काळात शिवली गावातील सर्वच मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करीन असे सांगून शिवली गावच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास शिवली आणि परिसरातील भाविक भक्त महिला पुरुष भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

